<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१</u>

<u>नि.फौ.ख.क्र.१९१/२०२३</u>
**सरकार विरूध्द सचीन बोंबले**
**निशाणी – ३१**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की,**

**माझे नाव – नंदा दिनेश बांते**
**वय – अंदाजे ५६ वर्ष,**
**व्यवसाय – जनरल मॅनेजर, निर्मल उज्वल क्रेडिट को. सो., नागपूर**
**राहणार – जयताळा, नागपूर.**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. लुले यांच्या कडून**

मी १९८९ पासून निर्मल उज्वल क्रेडिट को.सोसायटी मध्ये अकाउंटंट म्हणून नोकरीला लागले. मी २०१० साली जनरल मॅनेजर म्हणून पदभार स्वीकारला. आमच्या सोसायटीच्या ६५ शाखा आहे. मध्ये प्रदेश, गुजरात, गोवा व महाराष्ट्र या राज्यामध्ये आमच्या शाखा आहेत. पोलिसांनी गुन्हे शाखेमध्ये बोलवून माझा बयान नोंदविला. निर्मल बँकेला चारू भाटीया या नावाने असिस्टंट जनरल मॅनेजर होते. बँकेने त्यांना दि.२४.०४.२०१७ रोजी असिस्टंट जनरल मॅनेजर म्हणून ऑफर लेटर दिले होते. त्यांनी ते स्वीकारले व दि.११.०८.२०१७ ते रूजु झाले. त्याचवेळी त्या सोसायटीला असिस्टंट जनरल मॅनेजर याची पोस्ट खाली होती. त्या पोस्ट वर त्यांना सोसायटीने मानधनावर १ वर्षासाठी नियुक्त केले. आमच्या सोसायटीमध्ये त्या मार्केटिंग चे काम पाहत होते. त्यांना दर महा रू.५५,०००/– वेतन देण्यात येत होता. त्यांना ४९,३००/– रूपयांचा धनादेश दर महा कर कपात करून देण्यात येत होता.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे वकील श्री. प्रवीण पांडे यांच्या मार्फत सुरू**

प्रमोद नथ्थुजी मानमोडे हे आमच्या संस्थेत २०१७ मध्ये संचालक होते. प्रमोद मानमोडे यांच्याविरोधात धोकाधडीची खुप सारे प्रकरण दाखल झाली होती का याची मला माहिती नाही.

प्रश्न :– निर्मल उज्व क्रेडिट कोओपरेटीव्ह सोसायटीमध्ये क्राईम ब्रांच व स्थानिक पोलिस मानमोडे यांचे जबाब घेण्यासाठी संस्थेत येत होते का ?
उत्तर :– या केस संदर्भात आल्याचे मला माहिती आहे.

या केसच्या चौकशीच्या दरम्यान पोलिस चारू भाटीया यांची चौकशी करण्यासाठी सोसायटी मध्ये आले नव्हते. साक्षीदार सांगते की पोलिस बँकेत आले होते. प्रमोद मानमोडे हे सोसायटीचे सचीव होते त्यानंतर ते संचालक झाले. हे म्हणणे खरे नाही की चारू भाटीया यांना रोख स्वरूपात पगार दिला जात होता. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे वकील श्री. दुर्गे यांच्या मार्फत सुरू**

हे म्हणणे खरे नाही की बँक सोसायटीच्या अंतर्गत येते. हे म्हणणे खरे नाही की गुन्हयाबाबतची माहिती पोलिसांनी दिली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे संपला.**

**फेरतपासणी नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.03.11 11:02:01 +0530

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक १०/०३/२०२६